## नियमित दिवाणी मुकदमा क्र.६३/२००८ मधील नि.१०४ खालील आदेश
## (CNR-MHSN090006472008)

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने फेरिस्तसोबत दाखल केलेल्या खरेदीपत्रास निशाणी देणेकरिता दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी फेरिस्त नि.३ सोबत अ.नं.४ ला दिनांक ०७.०६.१९५१ रोजी एकनाथ नारायण म्हसवडकर व आप्पा शंकर माळी यांचेमध्ये विसापूर येथील स.नं.१/२ चे मुळ खरेदीपत्र हजर केलेले आहे. सदरचे खरेदीपत्र हे ७० वर्षापूर्वीचे जुने खरेदीपत्र आहे. सदर खरेदीपत्रामधील देणार, घेणार व साक्षीदार हे मयत झाले आहेत. सदर खरेदीपत्रास ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. सदर खरेदीपत्रास अदयाप निशाणी दिलेली नाही. भारतीय पुरावा कायदयाचे कलम ९० प्रमाणे मुळ खरेदीपत्रास निशाणी दिलेशिवाय वादीस सरतपास देणे अवघड झाले आहे. सबब, फेरिस्त नि.३ सोबत अ.नं.४ ला दिनांक ०७.०६.१९५१ रोजीच्या मुळ खरेदीपत्रास निशाणी देणेकरिता वादी यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जाचे पाठीमागे म्हणणे दाखल करुन वादीचा अर्ज नाकारला आहे. प्रतिवादीनी असे कथन केले आहे की, सदर खरेदीपत्रातील देणार व घेणार हे जोपर्यंत पुराव्याच्या कायदयातील तरतूदीप्रमाणे शाबीत होत नाहीत तोपर्यंत खरेदीपत्रातील मजकूर शाबीत होत नाही. या स्टेजला खरेदीपत्रास निशाणी देता येत नाही. वादी यांना प्रथम पुरावा या दस्ताआधारे देता येत नसला तरी पुराव्याच्या कायदयामध्ये दुय्यम पुरावा देण्याची तरतूद आहे. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज केवळ दावा प्रलंबीत ठेवण्याच्या उद्देशाने दिलेला आहे. सबब, वादींचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेख पाहिला. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. सर्वप्रथम महत्वाची बाब अशी आहे की, भारतीय पुरावा कायदा कलम ९० प्रमाणे एखादा दस्तऐवज तीस वर्ष जुना असेल तर त्यावरील सहया व त्या दस्तऐवजाचा प्रत्येक भागावरील मजकूर एखादया व्यक्तीने लिहीलेला असल्याचे तसेच तो दस्तऐवज निष्पादीत व साक्षांकीत त्या व्यक्तीने केली असल्याचे सांगता येते. तसा दस्तऐवज न्यायालयास पुराव्याकामी थेट

वाचता येते. सदर दाव्यात वादी यांनी फेरिस्त नि.३/४ कडील दिनांक ०७.०६.१९५१ दस्तऐवज दाखल केला आहे. त्याचे अवलोकनावरुन असे दिसून येते की, सदरचा दस्तऐवज हा मुळ असून तीस वर्षापेक्षा जास्त जुना आहे. अशा परिस्थितीत त्यावरील साक्षीदार तपासणे गरजेचे नाही व त्या दस्तऐवजाला थेट निशाणी देता येते. वरील सर्व कारणांचा विचार करता वादी यांचा अर्ज मंजूर करण्याच्या निष्कर्षास येवून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**:: आदेश ::**

१. वादी यांचा नि.१०४ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी फेरिस्त नि.३/४ सोबत दाखल केलेल्या दिनांक ०७.०६.१९५१ रोजीचे खरेदीपत्रास निशाणी देणेत यावी.

Jyotimala Chandrashekhar Gupta

Digitally signed by Jyotimala Chandrashekhar Gupta
Date: 2021.03.20 13:35:18 +0000

**तासगांव.** **(श्रीमती जे.सी. गुप्ता)**

**दि.१९.०३.२०२१** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, तासगांव.**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | U.P.Patil |
| Court | : | Jt.Civil Judge Jr.Dn. and Judicial Magistrate F.C., Tasgaon. |
| Date | : | 19.03.2021. |
| Order signed by the Presiding officer on | : | 19.03.2021. |
| Order uploaded on | : | 20.03.2021. |